सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

१ स्वागत मूल्य रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ५२ | रविवार, दि. १६ नोव्हेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष
१६ नोव्हेंबर

- कवीकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठातर्फे दिला जाणारा संस्कृत रचना पुरस्कार डॉ. गजानन बाळकृष्ण पळसुले यांना जाहीर.
- कोकण रेल्वेच्या रत्नागिरी – मुंबई मार्गाचा शुभारंभ.
- युनेस्को (UNESCO) स्थापना.
- स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी रत्नागिरीत स्पृश्यास्पृश्यांचे पहिले प्रकट सहभोजन केले.
- लाहोर कटातील आरोपी विष्णू गणेश पिंगळे, बागी कर्तार सिंग यांच्यासह ७ जणांना फाशी देण्यात आली.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

पंढरपूर येथे विठ्ठल-रुक्मिणीला थंडीमुळे उबदार कपडे
पान ३...

कांदा व लसूण धर्मशास्त्रात निषिद्ध का?



पंचमुखी हनुमानाची पूजा करण्याचे फायदे
पान ४...

# नियमांचे उल्लंघन करुन पुण्यात प्री-वेडिंग फोटोशूट

## लग्न ठरलेल्या जोडप्याला दंड, फोटोग्राफरही अडकला!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

परवानगी न घेता पुण्यातील मंडई मेट्रो स्टेशन येथे प्री-वेडिंग फोटो शूट करणे एका जोडप्याला चांगलेच महागात पडले आहे. 'महामेट्रो'कडून प्री-वेडिंग करणाऱ्या जोडप्यासह छायाचित्रकार अशा एकूण पाच जणांवर मेट्रो प्रशासनाकडून कारवाई करण्यात आली आहे.

मेट्रो स्टेशन व मेट्रोमध्ये फोटोशूट करण्यासाठी मेट्रोकडून परवानगी घ्यावी लागते. शिवाय कोणत्या वेळी, किती लोक या सर्व बाबींचा तपशील मेट्रोला द्यावा लागतो. त्यानुसार मेट्रोकडून शुल्क आकारले जाते. मात्र, हे सर्व नियम धाब्यावर ठेऊन एका जोडप्याने फोटोशूट केले होते. मेट्रोच्या सार्वजनिक मालमत्तेच्या नियमांचे उल्लंघन करणे त्यांना चांगलेच महागात पडले आहे. मेट्रो प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, मंडई मेट्रो स्थानकावर उद्घोषणा करून वारंवार फोटोशूट न करण्याची सूचना करण्यात येत होती. तरीही या जोडप्याने आणि फोटोग्राफरने आपले काम थांबवले नाही. या निष्काळजीपणामुळे अखेर पुणे मेट्रो प्रशासनाने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली.

पुण्यात वाहनसंख्येत भर

दुसरीकडे, पुण्यात वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर झालेला आहे. ऑक्टोबर महिन्यात पुणे प्रादेशिक परिवहन विभागाकडे (आरटीओ) ४५ हजार नवीन वाहनांची नोंदणी झाल्याचे समोर आले आहे. राज्यात एका 'आरटीओ'कडे झालेली ही सर्वाधिक नोंदणी आहे. पुणे जिल्ह्यात एकूण ८० हजार वाहनांची विक्री झाली आहे. ही राज्यातील उच्चांकी नोंदणी ठरली आहे. त्यामुळे पुण्यात वाहतुकीचा प्रश्न आणखी गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. केंद्र सरकारने वाहनांवरील वस्तू आणि सेवा कर अर्थात जीएसटी मध्ये कपात केल्यानंतर दसऱ्यापासून वाहन खरेदी करण्याचा वेग वाढला आहे.

# देवगाव- देवळीत पोलिसांकडून गावठी दारु हातभट्ट्यांवर छापा!

## तीन जणांना अटक; ९६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- तालुक्यातील देवगाव- देवळी येथे पोलिसांनी शनिवार, दि. १५ नोव्हेंबर रोजी गावठी दारु हातभट्ट्यांवर छापा घातला. या कारवाईत तीन जणांना अटक करण्यात आली आहे. ९६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी तीन वेगवेगळ्या ठिकाणी कारवाई केली. पहिल्या कारवाईत सखाराम लालचंद भिल (वय ४५, रा. देवगाव देवळी) याच्याकडे छापा घालून २०० लिटर कच्चे रसायन, १०० लिटर पक्के रसायन व २५ लिटर तयार गावठी दारू, प्लास्टिक ड्रम, लोखंडी पत्री ड्रम आणि कॅन्स असा एकूण ३२ हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. दुसऱ्या कारवाईत छगन जामराव भिल (वय ५०, रा. देवगाव देवळी) याच्याकडून १५० लिटर कच्चे रसायन, १०० लिटर उकळते रसायन आणि २० लिटर तयार दारू असा एकूण ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तिसऱ्या छाप्यात मिराबाई नगराज भिल हिच्या ताब्यातून १०० लिटर क्षमतेचे ४ प्लास्टिक ड्रम, कॅन्स व तयार दारू असा एकूण ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल केला.

पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नामदेव बोरकर, हेड कॉन्स्टेबल गणेश पाटील, प्रशांत पाटील, मिलिंद सोनार, सिद्धांत सिसोदे यांनी कारवाई केली. नमुने जप्त करून उर्वरित रसायन व दारू नष्ट करण्यात आली. अमळनेर पोलीस टाण्यात तिघांवर गुन्हा दाखल झाला आहे. हेड कॉन्स्टेबल गणेश पाटील करीत आहेत. या कारवाईने गावठी दारु विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहे.



### हिरा उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष

# हिरालाल चौधरी यांचे निधन

## माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांना पितृशोक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : नंदुरबार येथील हिरा उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष तथा अखिल भारतीय तैलिक महासभेचे प्रांतीय उपाध्यक्ष व समाजभूषण हिरालाल (काका) मगनलाल चौधरी (वय ८७) यांचे शनिवार, दि. १५ नोव्हेंबर रोजी पहाटे अल्प आजाराने निधन झाले. माजी आमदार शिरीषदादा चौधरी व डॉ. रवींद्र चौधरी यांचे ते वडील होत. त्यांच्यावर नंदुरबार येथील दंडपाणेश्वर रोडवरील कोकणी हिलनजीकच्या सहकारमहर्षी पी. के. अण्णा पाटील महाविद्यालयाच्या प्रांगणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

याप्रसंगी समाजबांधवांसह विविध संस्था, संघटनांचे पदाधिकाऱ्यांसह त्यांच्यावर प्रेम करणारे विविध क्षेत्रांतील अनेक हितचिंतक उपस्थित होते. हिरालाल (काका) चौधरी यांच्या निधनामुळे चौधरी परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्यामागे दोन मुलगे, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. दै. ' ग्लोबल महातेज' परिवारातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

## झाडांची आई हरपली



पर्यावरणतज्ज्ञ, वृक्षमाता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'पद्मश्री' पुरस्कार विजेत्या 'सालुमारदा थिम्मक्का' यांचे आज निधन झाले. त्या ११४ वर्षांच्या होत्या. आजवर त्यांनी ८ हजारहून अधिक झाडे लावली आहेत. या झाडांच्या आईला दै. 'ग्लोबल महातेज' तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली...!

# आझाद यांनी दिला क्रांतिकारकांच्या आठवणींना उजाळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

## द्रौ. रा. कन्याशाळेस भेट; विद्यार्थिनींना केले प्रेरीत



अमळनेर- क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांचे नातू अमित आझाद व त्यांच्या पत्नी नेहा आझाद यांनी येथील श्रीमती द्रौ. रा. कन्या शाळेस शनिवार, दि. १५ नोव्हेंबर रोजी भेट दिली. यावेळी त्यांनी विद्यार्थिनींना क्रांतिकारकांच्या इतिहासाच्या घटनांना उजाळा देऊन विद्यार्थिनींना प्रेरीत केले.

अमित आझाद यांनी सांगितले, की क्रांतिकारकांचा इतिहास हा आजही ज्वलंत आहे. वंदे मातरम, भारत माता की जय, इन्कलाब जिंदाबाद हे घोषवाक्य राष्ट्रभावनेला पेटविणारे आहे. त्यातून उर्जा

पान ३ वर

# प्रचारासाठी मिळणार फक्त पाचच दिवस!

## दारोदारी फिरण्यास उमेदवारांची होणार दमछाक!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- पालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. सोमवार, दि. १७ नोव्हेंबर अर्ज दाखल करण्याची अंतीम तारीख आहे. आता दोनच दिवस शिल्लक असून, उमेदवारांची भाऊगर्दी होणार आहे. कोणत्याही पक्षाने व आघाडीने अद्याप उमेदवारांची याद्या जाहीर केलेल्या नाहीत. त्यामुळे अनेकांचा जीव भांड्यात आहे. उमेदवारी अर्ज माघारी व चिन्ह वाटपानंतर २६ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर हे पाचच दिवस खऱ्या अर्थाने प्रचारास मिळणार आहेत. मात्र, फक्त पाच दिवसात मतदारांच्या दारोदारी फिरण्यासाठी उमेदवारांची दमछाक होणार आहे.

### उमेदवारी अर्जांची शंभरी पार

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या सहाव्या दिवशी शनिवार, दि. १५ नोव्हेंबर रोजी ६५ नगरसेवक पदासाठी तर नगराध्यक्ष पदासाठी ३ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. आज पर्यंत एकूण संख्या नगरसेवक पदासाठी ११८ तर नगराध्यक्ष पदासाठी ५ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. उमेदवारी अर्जांची शंभरी पार झाली आहे.

**सोशल मिडियाचा वापर**

उमेदवारांना सर्वच मतदारांपर्यंत पोहोचणे शक्य नाही. त्यामुळे सोशल मिडियाचा मोठ्या प्रमाणात वापर सुरु आहे. उमेदवार व त्यांचे समर्थकांनी विविध ग्रुप तयार केले आहेत. या ग्रुपवर प्रभागातील कुटुंबातील सदस्यांचा समावेश केला जातो. त्या माध्यमातून प्रचारांचे बॅनर टाकून प्रचार केला जात आहे.

**नेत्यांचा सावध पावित्रा**

प्रमुख पक्षांकडून नगराध्यक्ष, नगरसेवकपदाचे उमेदवार अद्याप जाहीर झालेले नाहीत. मात्र, तरीही विकासकामांची कॅसेट रिक्षाद्वारे वाजविली जात आहे. अनेक उमेदवारांचा छुप्या पद्धतीने प्रचार सुरू आहे. नगरसेवकपदाच्या शर्यतीत एकाच पक्षातील अनेक इच्छुक आहेत. यामुळे बंडखोरीचा धोकाही नाकारता येत नाही. पडद्याआड विरोधकांना मदत केली जाण्याचीही शक्या असल्याने नेते मंडळींनी सावध पावित्रा घेतला आहे.

# हिरवे, पिवळे की ठिपके असलेले केळ!

## कोणते केळ आरोग्यास फायदेशीर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



हिरव्या ते पिवळ्या आणि तपकिरी ठिपके असलेली केळी अशा प्रत्येक टप्प्याचे तुमच्या शरीरावर वेगवेगळे परिणाम असतात, असे तज्ज्ञांचे मत आहे. केळी हे जवळजवळ सर्वांनाच आवडणारे फळ आहे. शिवाय ते सर्व ऋतूंमध्ये असते. कोणतीही खटाटोप न करता आणि खाण्यासाठी असे अत्यंत पौष्टिक. मात्र, केळीचे फायदे ते किती पिकले आहे यावर देखील अवलंबून असतात. हिरव्या ते पिवळ्या आणि तपकिरी ठिपके असलेली केळी अशा प्रत्येक टप्प्याचे तुमच्या शरीरावर वेगवेगळे परिणाम असतात.

हार्वर्ड आणि स्टॅनफोर्ड इथल्या प्रशिक्षित गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट यांनी याबाबत माहिती दिली आहे. केळीचा कोणता टप्पा आरोग्यासाठी सर्वात फायदेशीर असतो हे सांगितले आहे.

**हिरवी केळी**

कच्च्या आणि हिरव्या केळ्यांमध्ये प्रतिरोधक स्टार्च असतो. हा स्टार्च तुमच्या आतड्यांसाठी अत्यंत फायदेशीर असतो. त्यात फायबरचे प्रमाण जास्त आणि साखरेचे प्रमाण कमी असते. १०० ग्रॅम हिरव्या केळ्यांमध्ये सुमारे १० ग्रॅम साखर असते. ते आतड्याच्या आरोग्यासाठी आणि रक्तातील साखर नियंत्रणासाठी उत्कृष्ट आहेत. असे असले तरी त्यांची चव थोडी कडू असते. काही लोकांसाठी ते पचण्यास जड असू शकते.

हलक्या हिरव्या रंगाची केळी

केळी खाण्याची सर्वोत्तम वेळ म्हणजे जेव्हा ती थोडीशी हिरवी असतात. म्हणजेच ती पूर्णपणे कच्ची किंवा पूर्णपणे पिकलेली नसतात. या टप्प्यावर केळ्यांमध्ये सुमारे २. ७ ग्रॅम फायबर असते. त्यात पोटॅशियम देखील जास्त असते. ते पोटासाठी चांगले असतात. ऊर्जा देतात आणि रक्तातील साखरेचे संतुलन राखण्यास मदत करतात. यामुळे ते दररोज खाण्यासाठी सर्वात आरोग्यदायी ठरतात.

**पूर्ण पिवळी केळी**

जेव्हा केळी पूर्णपणे पिवळी होतात, तेव्हा त्यातला स्टार्च साखरेत रूपांतरित होतो. त्यामुळे ते सहज पचण्याजोगे आणि ऊर्जा देणारे ठरते. तज्ज्ञ सांगतात की, केळ्यामध्ये कमी प्रतिरोधक स्टार्च असते, मात्र, व्हिटॅमिन सी, बी ५ आणि अँटी ऑक्सिडंट्स जास्त असतात. म्हणूनच व्यायामापूर्वी किंवा थकवा आल्यानंतर त्वरित ऊर्जेसाठी हा सर्वोत्तम पर्याय आहे.

**तपकिरी ठिपके असलेली केळी**

केळीवर तपकिरी ठिपके दिसले तर ती फेकून देऊ नका. या टप्प्यावर केळ्यामध्ये सुमारे १७ ग्रॅम साखर असते. त्यात थोडे कमी फायबर असते. मात्र, अँटीऑक्सिडंट्सचे प्रमाण सर्वाधिक असते. ही अवस्था चवीसाठी आणि अँटीऑक्सिडंट्स वाढवण्यासाठी चांगली असते. पण रक्तातील साखर वाढवण्यासाठी नाही.

**कोणते केळ सर्वात चांगले?**

प्रत्येक प्रकारचे केळ त्याच्या पद्धतीने फायदेशीर आहे. मात्र, जर तुम्हाला फायबर, पोषक तत्वे आणि नैसर्गिक गोडवा यांचे संतुलन हवे असेल तर थोडे हिरवे केळ सर्वात उत्तम आहे. ते तुमचे आतडे निरोगी ठेवते. रक्तातील साखर नियंत्रित करते आणि दिवसभर ऊर्जा देते.

मसाला पान



# बॉलीवूडमधील सर्वांत श्रीमंत कुटुंब : ना खान, ना कपूर, ना बच्चन; एकेकाळी फळे विकणारे, आज १० हजार कोटींची संपत्ती



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बॉलीवूडमधील सर्वांत प्रभावशाली आणि श्रीमंत कुटुंबांचा विचार केल्यास खान, कपूर आणि बच्चन ही आडनावे प्रथम डोळ्यांसमोर येतात. या कुटुंबांनी आपल्या अभिनय, निर्मिती आणि दिग्दर्शनाने हिंदी चित्रपटसृष्टीत स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. मात्र आपणास माहीत आहे का की बॉलीवूडमधील सर्वांत श्रीमंत कुटुंब हे या तिन्ही कुटुंबांपेक्षा वेगळे आहे, हे कुटुंब आहे टी-सीरिजचे मालक भूषण कुमार आणि त्यांच्या कुटुंबाचे. ज्यांची एकूण संपत्ती तब्बल १० हजार कोटी रुपये आहे.

### टी-सीरिजची सुरूवात : फळ विक्रेत्यापासून बॉलीवूडच्या शिखरापर्यंत

टी-सीरिजची स्थापना भूषण कुमार यांचे वडील गुलशन कुमार यांनी केली होती. एकेकाळी दिल्लीच्या रस्त्यांवर फळे विकणारे गुलशन कुमार यांनी आपल्या वडिलांच्या दुकानातून चित्रपट गाण्यांच्या कॅसेट्स विकण्यास सुरूवात केली. यातूनच त्यांनी स्वतःचे रेकॉर्ड लेबल सुरू केले. कालांतराने टी-सीरिजला बॉलीवूडमधील सर्वांत मोठे प्रॉडक्शन हाऊस बनविले. आज टी-सीरिज केवळ संगीतच नव्हे, तर चित्रपटनिर्मिती, वितरण आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवरही आपले वर्चस्व प्रस्थापित करत आहे.

**बॉलीवूडमधील सर्वांत श्रीमंत कुटुंब**

हुरून इंडिया रिच लिस्ट २०२४ नुसार भूषण कुमार यांचे कुटुंब बॉलीवूडमधील सर्वांत श्रीमंत कुटुंब म्हणून अव्वल स्थानावर आहे. टी-सीरिज या हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वांत मोठ्या स्टुडिओ आणि प्रॉडक्शन हाऊसचे मालक भूषण कुमार आणि त्यांचे कुटुंबीय एकत्रितपणे ही कंपनी चालवतात. या कुटुंबात भूषण कुमार, त्यांची पत्नी दिव्या खोसला कुमार, दोन बहिणी तुलसी कुमार आणि खुशाली कुमार, तसेच काका कृष्ण कुमार यांचा समावेश आहे.

**एकेकाळी कपूर व चोप्रा कुटुंब होते आघाडीवर**

एकेकाळी बॉलीवूडमधील सर्वांत श्रीमंत कुटुंबाचा मान कपूर कुटुंब. त्यानंतर चोप्रा कुटुंब यांच्याकडे होता. यशराज फिल्म्स आणि बीआर फिल्म्सचे मालक असलेल्या चोप्रा कुटुंबाची एकूण संपत्ती सुमारे ८ हजार कोटी रुपये असल्याचा अंदाज आहे. त्याचप्रमाणे शाहरुख खानच्या कुटुंबाची संपत्ती ७ हजार ५०० कोटी रुपये असल्याचे सांगितले जाते. मात्र, टी-सीरिजच्या भूषण कुमार यांच्या कुटुंबाने या सर्वांना मागे टाकत अव्वल स्थान मिळविले आहे.

**संपत्तीचा स्रोत**

हुरून रिच लिस्टमध्ये भूषण कुमार यांच्या वैयक्तिक संपत्तीचा तपशील दिलेला नसला, तरी उद्योगतज्ज्ञांचा अंदाज आहे, की कुटुंबाच्या संपत्तीपैकी सुमारे ८० टक्के हिस्सा हा भूषण कुमार यांच्याकडून येतो. टी-सीरिजच्या यशामागे त्यांचे व्यावसायिक कौशल्य, चित्रपटनिर्मिती आणि संगीत उद्योगातील नवीन संधींचा शोध ही प्रमुख कारणे आहेत.
बॉलिवूडमधील खान, कपूर आणि बच्चन या कुटुंबांनी आपल्या कलेने प्रेक्षकांचे मन जिंकले असले, तरी संपत्तीबाबत टी-सीरिजचे भूषण कुमार यांच्या कुटुंबाने आजमितीस सर्वांना मागे टाकले आहे.

# आयपीएस २१ व्या वर्षी, आयएएस २२ व्या वर्षी : दिव्या तंवरचा प्रेरणादायी यूपीएससी प्रवास

**सक्सेस स्टोरी...!**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आयएएस दिव्या तंवरने कोणतेही कोचिंग न घेता यूपीएससी दोनदा उत्तीर्ण केली. वयाच्या २१ व्या वर्षी आयपीएस आणि २२ व्या वर्षी आयएएस. हरियाणातील निम्बी गावातील या शेतकरी कन्येने अडचणींवर मात करत आपल्या मेहनतीने आणि आईच्या त्यागाने स्वप्ने साकार केली.

**आयुष्याला कलाटणी देणारी घटना**

२०११ मध्ये वडिलांचे निधन झाले तेव्हा दिव्याच्या आयुष्याला नवे वळण मिळाले. ही घटना अनेकांसाठी स्वप्ने संपविणारी ठरली असती. पण दिव्यासाठी ती प्रेरणा बनली. तिची आई, बाबिता तंवर यांनी पतीच्या निधनानंतर चार मुलांचा सांभाळ करण्याची जबाबदारी खांद्यावर घेतली. दिवसा शेतमजुरी आणि रात्री शिवणकाम करून त्यांनी मुलांचे शिक्षण आणि घरखर्च चालविला. त्यांच्या कष्ट आणि त्यागाने दिव्याच्या मनात मोठे यश मिळविण्याचे स्वप्न रुजले.



**शिक्षण आणि यूपीएससीची तयारी**

दिव्याने सरकारी शाळा आणि नंतर नवोदय विद्यालयात शिक्षण घेतले. आईच्या कष्टांची जाणीव असल्याने तिने महागड्या कोचिंग क्लासेसऐवजी मोफत ऑनलाईन साहित्य आणि मॉक टेस्ट्सचा आधार घेतला. ही गरज तिच्यासाठी वरदान ठरली. तिने स्वयंअध्ययन आणि चिकाटीने यूपीएससीची तयारी केली.

**यशाचा प्रवास**

२०२१ : पहिल्याच प्रयत्नात वयाच्या २१ व्या वर्षी तिने यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण करून AIR ४३८ मिळविले आणि आयपीएस बनली.
२०२२ : आयएएस बनण्याचे ध्येय पूर्ण करण्यासाठी तिने पुन्हा मेहनत घेतली. गुण ९३० वरून ९९४ पर्यंत वाढवत तिने AIR १०५ मिळविले आणि आयएएस बनली.

**प्रेरणादायी यश**

सध्या मणिपूर कॅडरमध्ये कार्यरत असलेली आयएएस दिव्या तंवरची कहाणी केवळ यूपीएससी उत्तीर्ण होण्याची नव्हे, तर आईच्या त्यागाची आणि मुलीच्या चिकाटीची साक्ष आहे. तिचा प्रवास दाखवतो की गरिबी आणि अडचणी स्वप्नांच्या आड येऊ शकत नाहीत. आत्मविश्वास, मेहनत आणि आईच्या निःशब्द प्रेरणेच्या जोरावर कोणतेही ध्येय अशक्य नसते. दिव्याची कहाणी विशेषतः ग्रामीण भागातील तरुणींसाठी प्रेरणास्थान आहे. तिचे यश सिद्ध करते की मेहनत आणि दृढनिश्चयापुढे कोणताही अडथळा मोठा नसतो.

# अब्जाधीश रोनाल्डो : जगातील पहिला अब्जाधीश फुटबॉलपटू



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ख्रिस्तियानो रोनाल्डो हा सध्याच्या घडीला जगातील सर्वोत्तम फुटबॉलपटूंपैकी एक आहे. वयाच्या ४० व्या वर्षीही त्याची निवृत्तीची चर्चा रंगत असली, तरी आगामी फुटबॉल विश्वचषक हा त्याचा अखेरचा विश्वचषक असेल, असे तज्ज्ञांचे मत आहे. याच दरम्यान, रोनाल्डोने एका वेगळ्याच क्षेत्रात इतिहास रचला आहे तो जगातील पहिला अब्जाधीश फुटबॉलपटू बनला आहे. सौदी अरेबियाच्या प्रो लीगमधील अल नास्सर क्लबसोबतच्या करारामुळे त्याच्या संपत्तीत प्रचंड वाढ झाली आहे.

**रोनाल्डो आणि मेस्सी : संपत्तीच्या बाबतीत बाजी**

ख्रिस्तियानो रोनाल्डो आणि लिओनेल मेस्सी यांची फुटबॉल मैदानावरील तुलना नेहमीच चर्चेचा विषय राहिली आहे. कमाईच्या बाबतीतही या दोघांमध्ये बराच काळ चुरस होती. मात्र, २०२३ मध्ये रोनाल्डोने सौदी अरेबियाच्या प्रो लीगमध्ये अल नास्सरसाठी खेळण्याचा निर्णय घेतला. त्याच्या संपत्तीत झपाट्याने वाढ झाली. दुसरीकडे मेस्सीने अमेरिकेच्या मेजर लीग सॉकरमध्ये खेळण्याचा निर्णय घेतला. अल नास्सर रोनाल्डोला सर्वाधिक वार्षिक वेतन देते. विशेष म्हणजे सौदी अरेबियातील ही कमाई करमुक्त (टॅक्स-फ्री) आहे. यामुळे रोनाल्डोला युरोपीय क्लबच्या तुलनेत खूप जास्त निव्वळ रक्कम मिळते.

**रोनाल्डोची कमाई : एक झलक**

ब्लूमबर्गच्या अहवालानुसार रोनाल्डोची एकूण संपत्ती सध्या १.४ अब्ज अमेरिकन डॉलर इतकी आहे. २००२ ते २०२३ या कालावधीत त्याने वेतनातून ५५० दशलक्ष डॉलर कमावले. ब्रँड जाहिरातींच्या बाबतीतही रोनाल्डो आघाडीवर आहे. दशकभरापूर्वीच्या एका अहवालानुसार त्याने निकेसोबत वार्षिक १८ दशलक्ष डॉलरचा करार केला होता. याशिवाय अरमणी आणि कॅस्ट्रोलसारख्या ब्रँडच्या जाहिरातींमधून त्याला १७५ दशलक्ष डॉलर मिळाले. २०२३ पासून अल नास्सरकडून खेळताना रोनाल्डोला वार्षिक २०० दशलक्ष डॉलर वेतन मिळते, जे करमुक्त आहे. याशिवाय त्याला ३० दशलक्ष डॉलरचा सायनिंग बोनसही मिळतो.

**नवीन करार : संपत्तीत मोठी भर**

जून २०२५ मध्ये रोनाल्डोने अल नास्सरसोबतचा करार वाढविला. या नवीन करारानुसार त्याला ४०० दशलक्ष डॉलर मिळणार असून, क्लबमध्ये १५ टक्के हिस्सेदारीही मिळेल. या करारामुळे रोनाल्डोने अब्जाधीशाचा टप्पा गाठला. फुटबॉलच्या इतिहासात एक नवा विक्रम प्रस्थापित केला.

# पायांना मुंग्या का येतात? कारणे आणि उपाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पायांना सतत मुंग्या येणे ही एक सामान्य समस्या आहे. अनेकदा रक्ताभिसरण नीट न होणे, स्नायूंवर ताण येणे किंवा जीवनसत्त्वांची कमतरता भासणे यामुळे ही समस्या प्रामुख्याने उद्भवते. यावर एक सोपा, नैसर्गिक आणि प्रभावी उपाय म्हणजे मोहरीच्या तेलाने मालिश करणे.

### मुंग्या येण्याची मुख्य कारणे

**रक्ताभिसरणाची कमतरता :** पायांमध्ये रक्तप्रवाह नीट न झाल्यास मुंग्या येण्याची शक्यता वाढते.
**स्नायूंवर ताण :** जास्त वेळ चालणे, उभे राहणे किंवा चुकीच्या पवित्र्यात बसणे. यामुळे स्नायूंवर ताण येतो.
**जीवनसत्त्वांची कमतरता :** विशेषतः व्हिटॅमिन बी १२ किंवा मॅग्नेशियमच्या कमतरतेमुळे नसांवर परिणाम होतो.

**मोहरीच्या तेलाने मालिश :** एक प्रभावी उपाय
कृती : रात्री झोपण्यापूर्वी मोहरीचे तेल कोमट पद्धतीने गरम करा. पायांना आणि विशेषतः पोटऱ्यांना हलक्या हाताने ५-१० मिनिटे मालिश करा. मालिशनंतर पाय स्वच्छ पाण्याने धुऊन थोडा वेळ कोमट पाण्यात बुडवून ठेवा (पर्यायी).
**फायदे :** मोहरीच्या तेलातील नैसर्गिक उष्णता रक्तप्रवाह सुधारते आणि स्नायूंना ऊब देते. स्नायूंचा ताठरपणा कमी होऊन नसांवरील ताण हलका होतो. नियमित मालिशमुळे पाय हलके वाटतात. मुंग्या येणे कमी होते आणि गाढ झोप लागते.
**विशेष उपयुक्तता :** थंड हवामानात जास्त चालणाऱ्या व्यक्तींसाठी किंवा उभे राहून काम करणाऱ्यांसाठी हा उपाय विशेष प्रभावी आहे.

### इतर उपाय आणि सावधानता

**आहार :** व्हिटॅमिन बी १२ (अंडी, दूध, मासे) आणि मॅग्नेशियम (हिरव्या पालेभाज्या, काजू) युक्त पदार्थांचा समावेश करा.
**व्यायाम :** नियमित हलका व्यायाम आणि स्ट्रेचिंग रक्तप्रवाह सुधारण्यास मदत करते.
**वैद्यकीय सल्ला :** जर समस्या कायम राहिली, तर डॉक्टरांचा सल्ला घ्या. कारण यामागे मधुमेह, नसांचे विकार किंवा इतर कारणे असू शकतात.
मोहरीच्या तेलाने नियमित मालिश हा पायांना मुंग्या येण्याच्या समस्येवर एक साधा आणि परिणामकारक उपाय आहे. सातत्याने हा उपाय केल्यास पायांचे आरोग्य सुधारते आणि झोपेची गुणवत्ता वाढते.

# लोग तुम्हें पत्थर मारें, तो उससे महल बनाओ रतन टाटा के वो कोट्स, जो जीना सिखाएंगे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रतन टाटा आज हमारे बीच नहीं हैं, लेकिन उनके शब्द आणि प्रभावशाली व्यक्तित्व आज भी जिंदा आहे. त्यांचे शब्द केवळ बोल नव्हते, तर त्यांच्या जीवनाचा अनुभव होता. त्यांची दूरदृष्टी प्रत्येक त्या व्यक्तीसाठी प्रेरणा आहे, जो स्वप्ने पाहतो आणि ती साकार करू इच्छितो. चला, जाणून घेऊ रतन टाटा यांचे ते मंत्र, जे तुम्हाला जीवनाचा मार्ग दाखवतील आणि अभिमानाने जगायला शिकवतील.

**रतन टाटा यांचे १० प्रेरणादायी कोट्स**

१) जिंदगी टीव्ही सीरियल नाही. खऱ्या आयुष्यात फक्त आणि फक्त काम आहे.
२) जर तुम्हाला वेगाने पुढे जायचे असेल तर एकटे चला. पण जर दूरपर्यंत जायचे असेल तर सर्वांना सोबत घ्या.
३) जर लोक तुम्हाला दगड मारतील, तर त्याचा उपयोग तुमचा महाल बांधण्यासाठी करा.
४) प्रत्येकाकडे समान प्रतिभा नसते. मात्र प्रतिभा विकसित करण्यासाठी समान संधी नक्कीच असतात.
५) लोहाला कोणी नष्ट करू शकत नाही. पण त्याचा गंज त्याला नष्ट करतो. त्याचप्रमाणे माणसाला कोणी नष्ट करू शकत नाही. मात्र त्याचा स्वतःचा विचार त्याला नष्ट करतो.
६) तुमच्या मुळांचा कधीही विसर पडू देऊ नका. तुम्ही जिथून आलात त्याचा नेहमी अभिमान बाळगा.
७) नेतृत्व म्हणजे सत्ता गाजवणे नव्हे, तर तुमच्या जबाबदारीत असलेल्या लोकांची काळजी घेणे.
८) एखादी लढाई जिंकण्यासाठी तुम्हाला ती एकदा पेक्षा जास्त वेळा लढावी लागेल.
९) जेव्हा तुम्ही स्वप्न आणि पूर्ण उत्साहाने काम करता, तेव्हा यश निश्चित आहे.
१०) शिकणे कधीही थांबवू नका, स्वतःला सतत आव्हान द्या जेणेकरून तुम्ही वाढत आणि विकसित होत राहाल.



**नैनो प्लांट : सिर झुकला नाही, डटून सामोरे गेले**

रतन टाटा यांनी आयुष्यभर प्रामाणिकपणा आणि मूल्यांशी तडजोड केली नाही. टाटा समूहाचे अध्यक्ष असताना त्यांना अनेकदा अशा परिस्थितींचा सामना करावा लागला. जेथे तडजोड सोपी होती, पण योग्य नव्हती. असाच एक प्रसिद्ध किस्सा पश्चिम बंगालच्या सिंगूर येथील आहे, जेथे नैनो कारच्या कारखान्याच्या जमिनीवरून वाद निर्माण झाला. आंदोलन इतके तीव्र झाले, की टाटा यांना कारखाना दुसरीकडे हलवावा लागला. अनेकांना वाटले, की रतन टाटा माघार घेतील. मात्र त्यांनी दृढनिश्चयाने कारखाना गुजरातला हलवला. हा त्यांच्या सिर झुकवणे हा पर्याय नाही या विचारसरणीचा पुरावा आहे. योग्य गोष्टीसाठी कितीही अडचणी आल्या, तरी लढत राहावे, असा संदेश त्यांनी दिला.

**भ्रष्टाचाराचा डाग लागू न देण्याचे रहस्य**

रतन टाटा यांचे नाव नेहमी प्रामाणिकपणाशी जोडले जाते. एका मुलाखतीत त्यांनी सांगितले, की त्यांनी कधीही राजकारण किंवा सत्तेशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला नाही. यामुळेच टाटा समूहावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप कधी लागले नाहीत. व्यावसायिक जगात शॉर्टकट आणि चुकीचे मार्ग स्वीकारण्याचा दबाव असतो, पण रतन टाटा यांनी नेहमी मूल्यांना प्राधान्य दिले.

**रतन टाटा यांचे निधन**

रतन टाटा यांचे १० ऑक्टोबर २०२४ रोजी मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात निधन झाले. त्यांचे विचार आणि कार्य मात्र कायम प्रेरणा देत राहील.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

## क्रांतिकारकांच्या आठवणींना उजाळा

**पान १ वरून :** मिळते. भविष्यातील वैज्ञानिक, राष्ट्रपती, आयपीएस अधिकारी शाळांमधूनच घडतात. विद्यार्थिनींनी मोठी स्वप्न पाहावीत. झांशीची राणी, छत्रपती शिवाजी महाराज, महाराणा प्रताप आणि चंद्रशेखर आझाद यांच्या संघर्षमय जीवनाचा अभ्यास करावा. चंद्रशेखर आझाद यांचे जन्मस्थळ छबुवा (मध्य प्रदेश) व बलिदानभूमी प्रयागराज (उत्तर प्रदेश) यांचा उल्लेख करुन १९१६ मधील प्रसंग त्यांनी सांगितला. १४ वर्षांच्या आझाद यांनी इंग्रजी शिपायांवर केलेल्या प्रतिकारानंतर झालेली मारहाण, त्यावेळी त्यांच्या तोंडून उमटणारे " भारत माता की जय, वंदे मातरम " हे घोषवाक्य, जेलरच्या चौकशीला दिलेली उत्तरे तसेच देशाच्या स्वातंत्र्यात ७ लाख ३२ हजार क्रांतिकारकांचे रक्त सांडले असल्याचे सांगितले. मुख्याध्यापिका एस. एस. देशमुख यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. एच. आर. आर्मीचे महाराष्ट्र उपाध्यक्ष कमलेश कुलकर्णी, जिल्हा प्रभारी आनंद चव्हाण, विभाग प्रभारी कौशल परदेशी, ग्रामीण प्रभारी सचिन खोरे व संकेत मांडे उपस्थित होते. डी. एन. पालवे यांनी सूत्रसंचालन केले. पर्यवेक्षक एस. एस. वाघ यांनी आभार मानले. ज्येष्ठ शिक्षिका आर.एस. सोनवणे, ज्येष्ठ लिपिक श्याम पवार, शिक्षक, शिक्षिका व कर्मचारी उपस्थित होते.

# कृषीभुषण साहेबराव पाटील कृषी क्षेत्रातही 'दादा'च...!

## 'सिंदूर' लागवडीचा दुसऱ्या वर्षीचाही प्रयोग भुषणावह...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर– माजी आमदार कृषीभुषण साहेबरावदादा पाटील हे राजकारणात दादा म्हणून सर्वांना परिचित आहेत. मात्र, त्यांनी या नावाला साजेशी कामगिरी अर्थात आपल्या राजवडमधील 'राज फार्म हाऊस' च्या माध्यमातून सलग दुसऱ्या वर्षी 'सिंदूर' लागवडीचा हंगाम उत्पादनाद्वारे यशस्वी करुन दाखविला. आपण कृषी उत्पादनातही सत्यप्रत दादाच आहोत, हे त्यांनी सिद्ध केले आहे. त्यामुळे त्यांना शासनाने दिलेली कृषीभुषण ही पदवी सार्थकी ठरणारी आहे.

कृषिभुषण साहेबरावदादा पाटील यांनी १५ ऑगस्ट २०२३ रोजी सिंदूरच्या ३५ रोपांची लागवड केली होती. नैसर्गिक कुंकू उत्पादन देणारे सिंदूर नावाचे झाड लागवडीपासून तीन वर्षांचा काळ लागतो. मात्र, त्यांनी लागवड केल्यापासून अवघ्या १५ महिन्यातच प्रतिवृक्ष १ किलो याप्रमाणे ३५ किलो सिंदूरचे उत्पादन घेण्याचा प्रयोग यशस्वी करुन दाखविला. सिंदूरच्या झाडावर लालसर रंगाची फळे येतात. ही फळे कोरडी झाल्यावर बिया काढल्या जातात. या बिया गडद लालसर रंगाच्या असतात. या बियांमध्ये नैसर्गिक रंगद्रव्य असते. बियांना सुकवून नंतर बारीक दळले जाते. त्याची लालसर पावडर तयार केली जाते. हीच पावडर कुंकू म्हणून वापरली जाते.

सिंदूरचा दुसरा हंगामही त्यांनी घेतला असून, शुक्रवार, दि. १३ नोव्हेंबर रोजी त्यांनी सिंदूरच्या लागवडीची पाहणी केली.

> एका एकरात ४३५ सिंदूर रोपांची लागवड होऊ शकते. एक झाड ५० किलोपर्यंत सिंदूर उत्पादन देऊ शकते. यासाठी ठिबकद्वारे अत्यंत कमी पाणी लागते. यासाठी कुठलेही फवारणी किंवा खत द्यावे लागत नाही. शेतकरी अंतरपीक म्हणूनही हे उत्पादन घेऊ शकतो. त्यामुळे शेतकरी जोडपीक म्हणून सिंदूरची लागवड करु शकतात.
>
> **– कृषीभुषण साहेबरावदादा पाटील,**
> माजी आमदार, अमळनेर.



# सडावण बुद्रुक येथे शिवस्मारकाचे लोकार्पण

## जि. प. सदस्य प्रतापवराव पाटलांनी दिली गाव विकासाची ग्वाही

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत सडावण बुद्रुक येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे नुकतेच लोकार्पण करण्यात आले. शिवरायांच्या प्रेरणादायी विचारांचा प्रसार व्हावा, तरुण पिढी घडावी आणि गावाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळावी या उद्देशाने हे स्मारक उभारण्यात आले आहे. जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांच्या हस्ते लोकार्पण झाले. गावविकासाची त्यांनी यावेळी ग्वाही दिली.

श्री. प्रतापराव गुलाबराव पाटील यांनी सांगितले, की शिवछत्रपतींचे वैभव, त्यांचे शासनतंत्र आणि आदर्श विचार घराघरात पोहोचले पाहिजेत. गाव माळकरी असून, मी देखील माळकरी आहे, त्यामुळे गावातील जास्तीत जास्त तरुणांनी व्यसनमुक्त राहावे. जेणेकरून गाव विकासाला चालना मिळेल. शिवाजी महाराजांचे ध्येयदर्शन तरुणांमध्ये जागृती निर्माण करते. त्या विचारांनी प्रेरित होऊन प्रत्येक युवक गावाच्या प्रगतीत सहभागी झाला पाहिजे. कार्यक्रमाला शिवसेना तालुकाप्रमुख सुरेश अर्जुन पाटील, शहरप्रमुख संजय पाटील, उपतालुकाप्रमुख विनोद बोरसे, तालुका संघटक भूषण कोळी, रामेश्वरचे लोकनियुक्त सरपंच गजेंद्र जाधव, तालुका प्रसिद्धी प्रमुख अनिल पवार, अल्पसंख्याक शहरप्रमुख शोयब शेख, उमाकांत चव्हाण, रामकृष्ण पाटील, सरपंच भय्यासाहेब पाटील, माजी सरपंच जिजाऊ पाटील, निंबा पाटील, गंगाराम पाटील, निंबा भिकन पाटील, सुनील पाटील, मधुकर पाटील, प्रकाश पाटील, राजाराम पाटील, बळीराम पाटील, शंकर नाईक, छोटू वानखेडे, अंकुश बिराडे, ग्रामसेवक सुरेश महाजन यांच्यासह ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.




# एकलहरे शिवारातून विद्युत तार चोरीस

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर– तालुक्यातील एकलहरे शेत शिवारातून ३ हजार ८०० मीटर लांबीची विद्युत तार चोरीस गेली आहे. ही घटना सोमवार, दि. १० नोव्हेंबर रोजी उघडकीस आली आहे.

महावितरणचे वरिष्ठ तंत्रज्ञ प्रमोद पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, एकलहरे येथील शेतकऱ्याने विद्युत तार चोरीची घटना कळविली होती. प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली असता २१ गाळ्यावरील थ्रीफेज लाइनवरील ३ हजार ८०० मीटर लांबीची व २१ हजार रुपयांची ॲल्युमिनियमची विद्युत तार चोरट्याने चोरुन नेली. याप्रकरणी मारवड पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद झाली आहे. हेड कॉन्स्टेबल मुकेश साळुंखे तपास करीत आहेत.

दरम्यान, ग्रामीण भागात विद्युत तारा, शेती पंप आदी चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात घडतात. पोलीसांनी अशा चोरट्यांचा कसून शोध घ्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.

## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

**ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत.** खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता, विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# पंढरपूर येथे विठ्ठल–रुक्मिणीला थंडीमुळे उबदार कपडे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राज्यात सर्वदूर थंडीची सुरुवात झाली आहे. अशातच विठुरायाचा पहाटेचा पोशाख देखील बदलला आहे. विठुरायाला सुतीची कानपट्टी, तर रखुमाईला उबदार शाल पांघरली जाते. थंडीपासून बचाव करण्यासाठी स्वेटर, कानटोपी, शाल खरेदी केली जात आहेत. अशातच लाखो वैष्णवांचे श्रद्धास्थान असलेला सावळ्या विठुरायाचा पहाटेचा पोशाख देखील बदलला आहे.



विठुरायाला सुतीची कानपट्टी तर रखुमाईला उबदार शाल पांघरली जाते. कार्तिक वद्य पंचमी ते माघ शुद्ध पंचमी या काळात पहाटे काकड आरती झाल्यावर सकाळी साडेआठपर्यंत हा पोशाख असतो, अशी माहिती श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सह अध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. देवाला प्रत्येक ऋतू प्रमाणे पोशाख आणि आहार दिला जातो. हिवाळ्यात विठुराया आणि रखुमाईला सकाळी उबदार पोशाख असतो. पहाटे काकड आरती झाल्यानंतर विठुरायाला कानपट्टी बांधली जाते. डोक्यावरून दोन्ही कान झाकले जातात. अंगावर शाल अशा पोशाखात राजस सुकुमार असे विठुरायाचे रूप दिसून यते. तर रखुमाईला दोन्ही खांद्यावरून उबदार शाल पांघरली जाते. वारकरी संप्रदायाची शेकडो वर्षांची परंपरेनुसार देवाचे पोशाख आणि आहार याची परंपरा आजही जोपासली जात आहे.

आपण इंग्रजी महिन्यानुसार हिवाळा, उन्हाळा, पावसाळा हे ऋतू पाळतो. मात्र, मराठी महिन्यानुसार देवाचे ऋतुमान आणि त्यानुसार आहार आणि पोशाखाची परंपरा आहे. विठुरायाला सुतीची कानपट्टी तर रखुमाईला उबदार शाल पांघरली जाते. कार्तिक वद्य पंचमी ते माघ शुद्ध पंचमी या काळात पहाटे काकड आरती झाल्यावर सकाळी साडेआठपर्यंत हा पोशाख असतो. त्याप्रमाणे कार्तिक वद्य पंचमीपासून पहाटे देवाला थंडीपासून बचाव करणारे पोशाख परिधान केले जातात. माघ शुद्ध पंचमीपर्यंत हिवाळा ऋतू मानला जातो. या काळात थंडी असते. त्यामुळे देवाला पहाटे उबदार पोशाख परिधान केला जातो. माघ पंचमीपासून पुढे उन्हाळा सुरू होतो. त्यावेळी देवाला पांढरा पोशाख तर पुढे चंदन उटी लावून उन्हाची दाहकता कमी केली जाते. पोषाखाप्रमाणे देवाचा आहार देखील ज्या त्या ऋतू प्रमाणे दिला जातो. असे असले तरी पहाटेच्या पोशाखात देवाचे रूप अधिकच खुलून दिसते.



# शिक्षण, कौशल्य, अभ्यास व ज्ञान जीवनाचे मुलमंत्र!

## धीरजकुमार वाघूलदे; प्रताप महाविद्यालयात व्याख्यान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर– सद्यस्थितीत यशस्वी जीवनाचे मंत्र समजून घेणे आवश्यक आहे, हे जीवन आपले आहे आणि कुटुंब जीवनमूल्य देणारे एक महत्वपूर्ण केंद्र आहे. विद्यार्थ्यांच्या यशासाठी सहभाग आणि प्रशिक्षण असणे गरजेचे आहे. शिक्षण, कौशल्य, अभ्यास व ज्ञान जीवनाचे मुलमंत्र आहेत, असे प्रतिपादन धीरजकुमार वाघूलदे यांनी केले.

खानदेश शिक्षण मंडळ संचलित प्रताप महाविद्यालयात रोजगार समुपदेशन, मार्गदर्शन केंद्र (सीसीएमसी),राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा), गुणवत्ता अभिवचन कक्ष (आयक्यूएसी) यांच्यातर्फे (स्व.) प्रा. र. का. केले यांच्या स्मरणार्थ शनिवार, दि. १५ नोव्हेंबर रोजी झालेल्या ' माझे जीवन, माझे शिक्षण ' या विषयावरील व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. प्रभारी प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव अध्यक्षस्थानी होते. उपप्राचार्य डॉ कल्पना पाटील, सिनेट सदस्य डॉ. धिरज वैष्णव, डॉ. संदीप नेरकर, डॉ. धनंजय चौधरी, डॉ. अमित पाटील, प्रा. मिलिंद ठाकरे, डॉ. नीलेश पवार, डॉ. व्ही. बी. मांटे, डॉ. नीलेश चित्ते, प्रा. नितीन पाटील, डॉ. हेमंत पवार, प्रा. वैशाली राठोड, डॉ. विवेक बडगुजर, डॉ. योगेश तोरवणे, डॉ. ज्ञानेश्वर मराठे, डॉ. माधव भुसनर, डॉ. ज्ञानेश्वर कांबळे, डॉ. सुनील राजपूत, प्रा. योगेश पाटील, डॉ. महेंद्र महाजन, डॉ. रवी बाळसकर, डॉ. रवींद्र मराठे, प्रा. जयेश साळवे, डॉ. विलास गावित, डॉ. अनिल झळके, डॉ. किरण गावित, प्रा. भाग्यश्री जाधव, ग्रंथपाल दीपक पाटील, प्रा. विजय साळुंखे, डॉ. अमोल मानके, डॉ. संतोष दिपके, प्रा. अतुल पाटील, क्रीडा संचालक डॉ. सचिन पाटील, डॉ. किरण सुर्यवंशी, डॉ. किरण भागवत, डॉ. बालाजी कांबळे, प्रा. हेमलता सूर्यवंशी, डॉ. प्रियांका पाटील, डॉ. राखी घरटे, प्रा. सोनूसिंग पाटील, डॉ. हर्ष नेतकर, प्रा. ईशिता घोष, प्रा. चित्रा मलेला, प्रा. कैलास बागुल, प्रा. प्रसाद मुठे, प्रा. दिलीप तडवी आदी उपस्थित होते.

श्री. वाघूलदे पुढे म्हणाले, की पैसा, चिंतन, आरोग्य यासाठी साध्य करिअर महत्वाचे आहे. आपण नोकरी व व्यवसाय नियोजनबद्ध पद्धतीने करणे फार आवश्यक आहे. समाजमान्य व शासनमान्य जे अधिकार असतात, घोषणा असतात त्यांचे पालन होणे आवश्यक आहे, तुमचे असणे कृती देते. कृती निकाल देते. त्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण घ्यावे लागेल. कौशल्याचा विकास, समर्पण भावनेने कार्य करणे उज्वल यशासाठी आवश्यक आहे. यासाठी जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाने प्रत्येक कृती करावी. प्रभारी प्राचार्य डॉ.जाधव यांनी आत्मविश्वासाने व परिश्रमाने आपले साध्य पूर्ण करावे, असे आवाहन केले. प्रारंभी क्रांतिकारक बिरसा मुंडा जयंती आणि आचार्य विनोबा भावे यांच्या स्मृती दिनानिमित्त प्रतिमापूजन करण्यात आले. करिअर कौन्सिलिंग सेंटरचे प्रमुख डॉ. विजय तुंटे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. जितेंद्र पाटील यांनी आभार मानले. अजय केले, सीसीएमसी विभागाचे प्रा. अमोल अहिरे, डॉ. आकाश गव्हाणे, पराग पाटील, दिलीप शिरसाठ, प्रा. हिमांशू गोसावी, अतुल धनगर, दीपक चौधरी, विशाल अहिरे, पदार्थ विज्ञान विभागाचे पवन शर्मा, विश्वास पाटील, अंबादास चावरीया आदींनी सहकार्य केले. विविध विद्याशाखेचे प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!

जाहिरात दर

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!
डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# कांदा व लसूण धर्मशास्त्रात निषिद्ध का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

" पलाण्डुभक्षणं पुनरुपनयनम् " ही शास्त्रोक्ती बऱ्याच वेळा कानावर येते. म्हणजे कांदा भक्षण केल्यावर पुन्हा मुंज करावी, असे सांगण्यात धर्मशास्त्राने कांद्याचा महानिषेध केलेला आढळतो. वास्तविक जमिनीखाली निपजणारे सर्वच कंद तसे निषिद्ध आहेत. पण हिंदू धर्मात विशेष करून कांदा व लसूण हे सर्वथैव त्याज्य मानले आहेत. खाद्यपदार्थांची हिसात्मक व निषेधात्मक प्रतवारी काढल्यास पाणी हे कमीत कमी म्हणजे १०-१२ टक्के निषिद्ध असते. ताजी फळे २०- २५ टक्के निषिद्ध असतात. हविष्यान्नाचे पदार्थ त्याहून अधिक म्हणजे ३०-३५ टक्के निषिद्ध असतात. नेहमीचे शाकाहारी पदार्थ ४०-४५ टक्के निषिद्ध असतात. कंदाहार ६० टक्क्यांपर्यंत निषिद्ध असतो. कांदा-लसूण हे ८० टक्क्यांपर्यंत निषिद्ध आहेत. अंडी ९० टक्क्यांपर्यंत निषिद्ध आहेत. मांस, मासे, मद्य हे पदार्थ १०० टक्के निषिद्ध आहेत.

काही आचारप्रधान संप्रदायात कंदाहार देखील पूर्ण निषिद्ध मानला आहे. म्हणजे त्या संप्रदायात ६० टक्क्यांच्या आतच निषिद्ध असलेल्या पदार्थांचे सेवन करण्यास परवानगी आहे. हिंदू धर्मात ८० टक्क्यांच्या आत निषिद्ध असलेल्या पदार्थांचे सेवन करण्यास परवानगी आहे. म्हणून कांदा-लसूण वर्ज्य मानले आहे. कांद्याचे शास्त्रीय व मानसशास्त्रीयदृष्ट्या प्रयोग झालेले आहेत.



कांदा सोलत गेल्यास शेवटी आत राहणारा कोंब हा मनोव्यापार चाळविणारा असतो. म्हणून कांद्यास कंदर्प (मदन) म्हटले जाते. कांद्याचे सेवन केल्यास त्याचा परिणाम रक्तात असेपर्यंत कामवासनात्मक विचार मनात थैमान घालतात. अर्थात देहाचे भान उडालेल्या अवधूत व्यक्तीस हा कोणत्याच प्रकारचा निषेध नसतो. इतके असूनही आयुर्वेदाने कांदा व लसूण यांचा समावेश औषधी वनस्पतीत केला आहे. (हृद्रोगास लसूण उपकारक असल्यामुळे तो लशुनादिवटीच्या द्वारे सेवन करता येतो.) त्याचप्रमाणे कांदा उष्णताहारक असल्यामुळे अंगात ज्वराधिक्य झाल्यास पोटावर, मस्तकावर कांद्याचा खिस ठेवून पोटात कांद्याचा रस गाळून देतात. पण जे पदार्थ औषधी गुणधर्मासाठी वापरले जातात त्याचा सर्रास चवीसाठी वापर केल्यास ते प्रकृतीस, संस्कारास व विचारास निश्चित हानिकारक ठरतात. कांद्याचा वापर सोवळ्याच्या स्वयंपाकात केल्यास तो स्वयंपाक ओवळा होतो, देवाला कांद्याचा नैवेद्य चालत नाही, धार्मिक गोष्टी, व्रतवैकल्ये इत्यादीप्रसंगी जेवणात कांदा, लसूण वापरला जात नाही. या सर्व गोष्टी कांदा-लसूण निषिद्ध असल्याचेच दर्शवितात.

आधुनिक युगात कांदा, लसणाना निषेध मानणे हे विडंबनात्मक ठरणार आहे, ही गोष्ट खरी आहे. पण हा निषेध केवळ धार्मिकदृष्ट्या नसून आरोग्यदृष्ट्याही आहे, हे लक्षात आल्यावर निदान कांद्याचा सद्याचा सर्रास वापर तरी बंद होण्यास मदत होईल. उपवासाच्या दिवशी, सकाळच्या जेवणात व इतर नैमित्तिक प्रसंगी तरी कांदा, लसूण टाळले जातील. वास्तविक प्राशन अथवा भक्षण केल्यावरही ज्या पदार्थांचा तोंडाला वास येतो, ते पदार्थ काक्षाने टाळावयाचे असतात, असा शास्त्र दंडक आहे. असे असतानाही केवळ तथाकथित खमंगपणाच्या आहारी जाऊन हे पदार्थ भक्षण केले जातात, हे बेलगामपणाचे द्योतक ठरते.

## मना सज्जना...



# मनोपनिषद...

परम स्नेही मित्र हो...

सद्गुरू समर्थांनी लिहिलेले मनाचे श्लोक एक ' उपनिषदच ' म्हणायला हवे. भारतीय संस्कृतीचा पाया मुळी वेद वाङ्मय आहे. वेदांचे जे सार आहे त्याचा सखोल ऊहापोह उपनिषदांत झालेला दिसून येतो. वेद जसे अपौरुषेय मानले जातात तसे उपनिषदही कुणी एकाने लिहिलेले नाही. परंतु संस्कृतीची धारणा त्यांनी केलेली आहे. यात मनाच्या जागृत, स्वप्न आणि सुषुप्ती अशा तीन अवस्था नमूद केल्या आहेत. निरोगी शरीरात निरोगी मन वसते, अशी धारणा त्यात आहे. योगसाधनेमुळे अचपळ मनावर नियंत्रण मिळविता येते, असे योगाचार्य पतंजली मुनी यांनी प्रतिपादन केले आहे.

या परंपरेतील सद्गुरू समर्थ आहेत. त्यांनी त्यांच्या आयुष्यात प्रचंड तप केले. देशाटन केले. प्रदेश पायी पालथे घातले. लोकव्यवहार, तीर्थस्थाने यांचे निरीक्षण, परीक्षण केले. एकूणच देश परिस्थिती अनुभवली. त्याच्या चिंतनातून त्यांनी व्यक्तीच्या विकासाशिवाय राष्ट्राचा उद्धार नाही हे जाणले. समाज सश्रद्ध होण्यासाठी, धर्मरक्षणासाठी आणि राष्ट्राच्या उद्धारासाठी मार्गदर्शन केले, उपासना सुचविल्या. बलशाली राष्ट्रासाठी बलशाली व्यक्तिमत्त्व हवे. ते उभे करण्यासाठी बलोपासना शिकविली. प्रभू श्रीरामचद्रांची, मारुतीरायांची मंदिरे उभारली, साधना केली. आयुष्यभर या कामी प्रयत्नशील राहिले. बहुविध समाजोपयोगी लिखाण केले. त्यांच्या मौलिक लिखाणाचे सार म्हणजे ' मनाचे श्लोक ' म्हणता येईल.

समर्थांनी दासबोधात ' अंतःकरण पंचक ' सांगितले आहे. यात मन, बुद्धी, चित्त, अहंकार आणि अंतःकरण अशा मनाच्या अवस्था नमूद केल्या आहेत. ज्ञानेंद्रिय, कर्मेंद्रिय यांच्या नियंत्रणासोबतच मनाच्या या अवस्था टप्प्या-टप्प्याने जिंकायच्या असतात तेव्हा मन नियंत्रणात राहते.

**मनाचे कलाने । मनाच्या मताने ।**
**जगणे आधीन सारे । मनाच्या मनाने ।।**

मनाच्या भूमीइतकी सुपीक भूमी दुसरी कोणतीही नाही. येथे जे बरे-वाईट पेरले जाते ते शतपटीने उगवते, उपजते, वर्धिष्णू होते. हा सारा ऊहापोह मनाचे श्लोक वाचताना आपल्याला अनुभवता येतो.

### काय आहे मनाचे श्लोकात?

मनाचे श्लोक भुजंग प्रयाग वृत्तात लिहिलेले आहेत. चार-चार ओळींच्या चरणात आहेत. एकूण २०५ श्लोक आहेत. त्यात १ ते ६६ श्लोक हे ' कर्मपर ' आहेत. ते परमार्थाची महती शिकवितात. ६७ ते १३५ हे श्लोक ' उपासनापर ' आहेत. ते प्रभू श्रीरामचंद्र यांची भक्ती शिकवितात. १३६ ते २०५ हे ' ज्ञानपर ' आहेत, जे वर्तन शिकवितात, असे ढोबळमानाने म्हणता येईल. यात विविध विषय हाताळले आहेत. यात भक्तिभावाने महिमा आहे. राम नामाचे महत्त्व आहे. सत्संग कसा धरावा? ते आहे. विचार, आचार आणि उच्चार यांची शुद्धी आहे. इंद्रिय दमनाचे महत्त्व आहे. परोपकार आहे. तसेच वितंडवाद टाळणे आहे. विचार, विवेक यांच्या आचरणातून श्रेष्ठतम ध्येय गाठणे आहे. सद्गुरू लक्षणे आणि कृपा आहे. प्रभू श्रीरामचंद्रांची उपासना आहे.

हे श्लोक अत्यंत प्रेमळ, रसाळ भाषेत आहेत. माधुर्यपूर्ण, अर्थपूर्ण आहेत. भक्तिरसात चिंब भिजविणारे आहेत. सन्मार्ग दर्शविणारे आहेत. परमार्थाच्या वाटेवर बोट धरून नेणारे आहेत. या श्लोकांच्या श्रद्धापूर्वक वाचनातून, चिंतनातून वृत्तीत आणि वर्तनात आमूलाग्र बदल घडून येतो. भक्तिभावाने केलेले श्रवण दोषांपासून मुक्त करते आणि व्यक्ती भक्तीमार्गाकडे वळते. त्याला ज्ञान, वैराग्य, सामर्थ्य यांची क्रमाक्रमाने प्राप्ती होते. मनाचा इतका सांगोपांग विचार यात मांडलेला आहे. म्हणून मनाचे श्लोक हे एक ' उपनिषद 'च आहे. आपण ' मनोपनिषद ' म्हणायला हरकत नाही.

मनाचे श्लोक वाचताना समर्थांची पुढील शिकवण सतत स्मरणात ठेवावी. म्हणजे आपल्या आकलनात भर पडत जाते. नकळत वाचणाऱ्यालाही ज्ञान, वैराग्य, सामर्थ्य प्राप्ती होत जाते. हे याचे फलित आहे.

**अखंड एकांत सेवावा । ग्रंथ मात्र धांडोळावा ।**
**प्रचित येईल तो घ्यावा । अर्थ मनी ।।**
**जय जय रघुवीर समर्थ ।**

**- भाऊसाहेब देशमुख**
**मो. : 9420389541**

# तिथी आणि तारखेत सगळ्यात महत्त्वाचा फरक काय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जर तुम्हाला उचलून कुणी एखाद्या निर्जन बेटावर नेऊन सोडले, तर तारीख फार-फार तर महिनाभर लक्षात राहील तुमच्या. त्यातही एखादाच जरी दिवस चुकला तरीही पुढचे सगळेच चुकणार, हे निश्चित. मात्र तिथीचे तसे नाही. तुम्ही एखाद्या निर्जन बेटावर आसला तर महिनाभराने कदाचित तिथीही विसरून जाल.

जर तुमचा खगोलशास्त्राचा जुजबी अभ्यास असेल, तर चंद्राची कला आणि पौर्णिमेला चंद्र कोणत्या नक्षत्रात आहे, केवळ एवढ्याच निरीक्षणावरून तुम्ही तिथी, महिना आणि पक्ष हे तिन्ही अगदी बिनचूक ठरवू शकता.

आज मोठमोठ्या शहरांमध्ये दुर्बिणीद्वारे आकाशदर्शनाचे फॅड आले आहे. जे ज्ञान मिळविण्यासाठी तुमच्यापैकी अनेकांनी रांगा लावल्या असतील. ते ज्ञान प्राचीन काळापासून प्रत्येक हिंदूला अगदी नकळत्या वयातच शिकविले जायचे केवळ आणि केवळ कालगणनेसाठी.

आजसुद्धा खेड्यापाड्यांमध्ये अशी कित्येक वृद्धमंडळी तुम्ही पाहिली असतील, जी कोणतेही घड्याळ वापरत नाहीत आणि तरीही केवळ सूर्याच्या अथवा चंद्राच्या स्थितीवरून अचूक वेळ सांगतात. ही आहे हिंदूंची कालमापनपद्धती. आपल्या आजोबांना अथवा आजीकडे याबद्दल चौकशी करावी. ते सांगतील ही कालमापनपद्धती. प्रत्येक सामान्य माणूस आपल्या आयुष्यात कशी वापरायचा ते आणि ती सगळ्या जातीवर्णांच्या अगदी सामान्य माणसापर्यंत पोहोचविली गेली होती, यावरूनच हिंदूंना संशोधनाच्या दृष्टीने कालगणना किती अत्यावश्यक वाटते, असे हे समजते. इंग्रज येण्याच्या आधीपासून भारतात चारही वर्णच नव्हे; तर अगदी स्त्रियासुद्धा सर्रास शिक्षण घेत असत. हे एका ग्रंथात सिद्ध केले आहे. इंग्रज आल्यानंतर भारतीय, विशेषतः स्त्रिया शिकू लागल्या. ही इंग्रजांनी मारलेली शुद्ध थाप आहे. जिला आजही स्वतःला पुरोगामी म्हणवणारी अक्कलशून्य जन्महिंदू जमात उचलून धरते. प्रत्यक्षात इंग्रजांनी आमचे उपरोल्लिखित रोजच्या आयुष्याला पूरक असे सकस शिक्षण बंद केले आणि त्याऐवजी त्यांच्या कारभाराला सोयीचे असे कारकुनी शिक्षण द्यायला सुरूवात केली. असो, तर त्याचसोबत इंग्रजांनी आमची विज्ञाननिष्ठ कालमापनपद्धती नष्ट करून सगळीकडेच त्यांची अवैज्ञानिक आणि अपूर्ण कालमापनपद्धती लागू केली.

विज्ञानानुसार काळ ही एक मिती आहे. त्यामुळेच ती नेहमीच सापेक्ष असते. आपण काळ मोजण्यासाठी जितकी अधिक परिमाणे आणि संदर्भ लावू तितका तो अचूक येतो. इंग्रजांच्या मुळात कॅलेंडरमध्येच ग्रेगोरियन आणि ज्युलियन असे घोळ. त्यातून दिवसांचा होणारा बेहिशेब कसाबसा सावरण्यासाठी दर महिन्याआड एक दिवस वाढविणे आणि फेब्रुवारीत कधी एक तर कधी दोन दिवस कमी करणे अशी बनवाबनवी आहेच.

इतके करूनही या कॅलेंडरमध्ये महिना, तारीख आणि वर्षच तेवढे समजते. घड्याळात केवळ तास, मिनिटे व सेकंद. याउलट हिंदू पंचांगाच्या नावातच त्याचा अर्थ दडलाय. पंच अंग म्हणजे पाच अंगे. कोणकोणती पाच अंगे? तर तिथी, वार, नक्षत्र, करण आणि योग. प्रत्येक दिवसाला ही पाच परिमाणे लावली जातात. तेव्हा कळणारा काळ हा इंग्रजी कॅलेंडरपेक्षा केव्हाही जास्तच अचूक असतो. शिवाय प्रहर, घटीका, पळे इत्यादी तर वेगळेच. लक्षात घ्या, येथे फक्त रोजच्या जीवनातील कालमापन तेवढे घेतले आहे.

भागवतपुराण हे अतिशय प्राचीन आहे. आपल्या सवयीप्रमाणे सारे काही शक्यतो बायबलच्या नंतरचे ठरवायचे, या अट्टाहासापायीदेखील पाश्चिमात्त्यांना त्याचा काळ सहाव्या शतकाच्या पुढे ओढता आलेला नाही. या भागवतपुराणाच्या तिसऱ्या स्कंधाचा ११ वा अध्याय वाचा. कालमापनाची परिमाणे दिली आहेत त्यात. सगळ्यात सूक्ष्म परिमाण सांगितले आहे परमाणू. सगळ्यात मोठे सांगितले आहे ते श्रीहरिचा एक निमेष अर्थात हरिनिमेष.

संपूर्ण अध्यायच सूक्ष्मापासून जडापर्यंत काळ कसा मोजायचा, हे स्पष्ट करण्यासाठी वाहिला आहे. यावर पूर्वी गणित केले होते. जोडीला एक संगणकतज्ज्ञ मित्र त्याच्या अत्याधुनिक संगणकासह मदतीला होता. गंमत काय झाली? सगळ्यात सूक्ष्म काळ मोजताना आणि सगळ्यात मोठा काळ मोजताना दोन्ही वेळेस त्याचा अत्याधुनिक संगणक ताण सहन न होऊन अक्षरशः बंद पडला.

याचाच दुसरा अर्थ असा, की गोऱ्या चामडीला ज्या काळी चामडी झाकण्यासाठी झाडाच्या साली गुंडाळण्याइतकीसुद्धा अक्कल आली नव्हती, त्या काळापासून आपण अत्यंत सूक्ष्मातिसूक्ष्मापासून मोठ्यात मोठ्या काळापर्यंत अचूक कालमापन करतो आहोत. अहो, येत्या गुढीपाडव्याला युगाब्द किती सुरू होतोय माहिती आहे? यावरून दिसते, की आज जे कॅलेंडर वापरतो ना आपण, त्याच्या किमान तीन हजार वर्षे आधीपासून आपण रोजच्या आयुष्यात कालगणना करतोय.

गंमत अशी, की हिंदूचे ८० रुपयांचे पंचाग आणि नासाचे अरबो रुपयांचे सेटेलाईट. दोघेही ग्रहणाची वेळ सारखीच सांगतात. तरीही आपण आपल्या धर्माची चेष्टा करतो. गर्व बाळगा, की आपण भारतात जन्मलो. जेथे सायन्सची तुलना फक्त आणि फक्त हिंदू वेद-पुराणासोबत केली जाते. बाकी कोणत्याही धर्मासोबत केली जात नाही.

# पंचमुखी हनुमानाची पूजा करण्याचे फायदे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पंचमुखी हनुमानाची पूजा केल्याने आध्यात्मिक आणि भौतिक दोन्ही प्रकारे अनेक फायदे होतात, असे म्हटले जाते. अनेक भक्त संरक्षण, धैर्य आणि त्यांच्या जीवनातील अडथळ्यांवर मात करण्यासाठी त्यांची प्रार्थना करतात. पंचमुखी हनुमानाची पूजा करण्याचे काही फायदे येथे आहेत.

**वाईटापासून संरक्षण**

पंचमुखी हनुमानाचे उग्र आणि संरक्षणात्मक स्वरूप भक्तांना नकारात्मक प्रभाव, वाईट आत्मे आणि दुर्दैवापासून वाचवते असे मानले जाते.

**शक्ती आणि धैर्य**

पंचमुखी हनुमानाची पूजा करणाऱ्या भक्तांना संकटांना आणि आव्हानांना धैर्याने तोंड देण्यासाठी मानसिक आणि शारीरिक दोन्ही शक्ती मिळते असे म्हटले जाते.

**ज्ञान आणि स्पष्टता**

पंचमुखी स्वरूपात हयग्रीवाचे मुख ज्ञान आणि बौद्धिक स्पष्टता प्रदान करते, जे भक्तांना त्यांच्या अभ्यासात, करिअरमध्ये आणि निर्णय घेण्यास मदत करते.

**आरोग्य आणि उपचार**

गरुडाचा चेहरा विषारी पदार्थ आणि नकारात्मक ऊर्जा काढून टाकतो असे मानले जाते. ज्यामुळे त्याची उपासना करणाऱ्यांना शारीरिक आणि आध्यात्मिक उपचार मिळतात.



**भक्तांसाठी धडा**

पंचमुखी हनुमानाची पूजा करून, आपण एक निर्भय आणि एकाग्र मन विकसित करू शकतो, जे शक्ती, ज्ञान आणि करुणेने युक्त आहे, जे जीवनातील अडचणींना आत्मविश्वासाने तोंड देण्यास मदत करते.

